| | | |
|---|---|---|
| | **प्रेसनोट**<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,<br>पुणे-४११००६ | |

जा.क्र./पोउआ/वाह/ 8507/२०२३ पुणे दिनांक - 29/११/२०२३

विषयः- मा.राष्ट्रपती भारत सरकार, यांचे दिनांक ३०/११/२०२३ ते दिनांक ०१/१२/२०२३ रोजीच्या पुणे भेटी दरम्यान वाहतूक व्यवस्थेत खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

मा. राष्ट्रपती भारत सरकार, यांचा दिनांक ३०/११/२०२३ ते दिनांक ०१/१२/२०२३ रोजी पुणे शहर दौरा असल्याने पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, पुणे शहरातील वाहतूकीमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

- दिनांक ३०/११/२०२३ रोजी दुपारी १३:०० ते १६:०० वा. पर्यंत व दिनांक ०१/१२/२०२३ रोजी सकाळी ०९:०० ते १२:०० वा. पर्यंत पुणे शहरामधुन पुणे विमानतळ येथे जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनचालकांनी पुणे नगर रोडवरील रामवाडी ते एअरपोर्ट रोडचा वापर करावा.
- दिनांक ३०/११/२०२३ ते दिनांक ०१/१२/२०२३ या कालावधीमध्ये लोहगांव ते विमानतळ ते विश्रांतवाडी येण्या-जाण्याच्या मार्गावर सर्व प्रकारच्या माल वाहतूक करणाऱ्या वाहनांना प्रवेश बंदी असेल.
- दिनांक ०१/१२/२०२३ रोजी सकाळी ०८:०० ते १२:०० वा. पर्यंत पुणे सोलापूर रोडवरील भैरोबानाला ते जेधे चौक (स्वारगेट) व भैरोबानाला ते पुणे स्टेशन (मोर ओढा मार्गे) या दोन्ही रस्त्यावर सर्व प्रकारच्या माल वाहतूक करणाऱ्या वाहनांना प्रवेश बंदी असेल.
- दिनांक ३०/११/२०२३ रोजी पुणे विद्यापीठ ते पाषाण रोडवरील रायगड बंगला हा एकेरी मार्ग तात्पुरत्या स्वरूपामध्ये १५:०० ते १६:०० वा. दरम्यान फक्त व्ही.व्ही.आय.पी. सांठी दुहेरी करण्यात येत आहे.

(विजयकुमार मगर)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रतः- सर्व संबंधीतांना